# MIDC भोसरी पोलीस ठाणे पोलीसांची कामगिरी

## देहूरोड परिसरात दहशत माजविणारा व पिंपरीत फायरींग करुन पोलीसांना गुंगारा देणारा सराईत गुन्हेगार एमआयडीसी भोसरी येथे कोयत्यासह जेरबंद

एमआयडीसी भोसरी पोलीस ठाणे कडील तपास पथकातील **पोलीस नाईक प्रणिल चौगले** यांना पिंपरी फायरींग मधील पाहिजे आरोपी राहूल विश्वकर्मा हा गवळीमाथा गुलाब पुष्प उद्यानासमोर भोसरी पुणे येथे आला असून त्याचेजवळ कोयता आहे. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने सापळा रचून पकडण्यात आले त्याचे नाव **राहुल कैलास विश्वकर्मा वय २१ वर्षे रा. मामुर्डीगाव, भैरवनाथ मंदीराजवळ, देहूरोड, पुणे** असे असून त्याचेकडे एक लोखंडी कोयता मिळून आला आहे.

त्याचेबाबत चौकशी करता त्याचेविरुध्द देहूरोड परिसरात दहशत पसरावून तोडफोडीचे गुन्हे तसेच खुनाचा प्रयत्न, जबरी दुखापत, मारामारी असे गुन्हे देहूरोड पोलीस ठाणे, पुणे ग्रामीण, येथे गुन्हे दाखल झाल्याने तेथून पसार होवून पिंपरी पोलीस ठाणे, पुणे हद्दीत संतोष कुरावत याचेवर फायरींग करुन खूनाचा प्रयत्न, असे गुन्हे करुन पोलीसांना गुंगारा देत होता. तो देहूरोड पोलीस ठाणे कडील **०३** गुन्हयात व पिंपरी पोलीस ठाणेकडील **०१** गुन्हयात फरार आहे.

सदरची कामगिरी ही अप्पर पोलीस आयुक्त श्री. शशीकांत शिंदे सो, मा. पोलीस उपायुक्त श्री गणेश शिंदे सो, तसेच मा.सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. राम मांडुरके सो, यांचे मार्गदर्शनाखाली MIDC भोसरी पोलीस ठाणेचे **वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. भिमराव शिंगाडे व पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. राजेंद्र विभांडीक, तपास पथकातील पोलीस उप निरीक्षक रावसाहेब बांबळे, पोलीस हवालदार अजय भोसले, रविंद्र तिटकारे, पोलीस नाईक किरण काटकर, प्रणिल चौगले, पोलीस शिपाई नवनाथ पोटे, अमोल निघोट, करन विश्वासे, विशाल काळे,** यांनी केली आहे. पुढील तपास पोलीस उप निरीक्षक रावसाहेब बांबळे हे करीत आहेत.